सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

---

# प्रेस नोट

(दि.१०/०९/२०२६)

(मानखुर्द पोलीस ठाणे)

## भक्कम पुरावे अन् प्रभावी न्यायालयीन पाठपुरावा; मानखुर्द पोलिसांच्या तपासामुळे दोन गंभीर गुन्ह्यांत दोषसिद्धी

मानखुर्द पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या विनयभंग व धारदार शस्त्राने हल्ला अशा दोन गंभीर गुन्ह्यांमध्ये तपासी अधिकारी, कोर्ट अंमलदार व समन्स वॉरंट पथक यांनी प्रभावीपणे कामकाज करून सरकारी अभियोक्त्यांशी योग्य समन्वय साधला. आरोपींविरुद्धचे सबळ पुरावे मा. न्यायालयासमोर प्रभावीपणे सादर केल्याने मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. 52, कुर्ला, मुंबई यांनी दोन्ही प्रकरणांमध्ये आरोपींना दोषी ठरवून शिक्षा सुनावली आहे.

1) **विनयभंग प्रकरण** : दिनांक 01/06/2013 रोजी सायं. 05.30 वा. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून फिर्यादीच्या घरात प्रवेश करून फिर्यादीचा विनयभंग केला, फिर्यादीच्या पतीस मारहाण, शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मानखुर्द पोलीस ठाणे गु.र.क्र. 163/2013, कलम 452, 354, 323, 504 भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात दिनांक 01/09/2026 रोजी आरोपी छोटेलाल कतवारु गुप्ता, वय 41 वर्षे, व्यवसाय चालक, रा. जयहिंदनगर, सोनापूर, मानखुर्द, मुंबई यास मा. न्यायालयाने आरोपीस कलम 354 भा.दं.वि. अन्वये 2 वर्षे सक्त कारावास व ₹10,000/- दंड, कलम 452 भा.दं.वि. अन्वये 2 वर्षे सक्त कारावास व ₹10,000/- दंड तसेच कलम 323 भा.दं.वि. अन्वये 3 महिने कारावास व ₹1,000/- दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

2) **धारदार शस्त्राने हल्ला प्रकरण** : दिनांक 01/10/2017 रोजी पहाटे 01.45 वा. मोटारसायकल पार्किंगच्या कारणावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून, धारदार शस्त्राने पोटावर कमरेवर वार करून जखमी केले होते फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन मानखुर्द पोलीस ठाणे गु.र.क्र. 269/2017, कलम 323, 324, 504, 34 भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता, दिनांक 02/09/2026 रोजी आरोपी 1) शंकर मोतीराम सोनटक्के, वय 26 वर्षे व 2) विशाल प्रभाकर दळवी, वय 26 वर्षे, दोघेही रा. मानखुर्द, मुंबई, यांना मा. न्यायालयाने कलम 324 सह कलम 34 भा.दं.वि. अन्वये 6 महिने सक्त कारावास व ₹1,000/- दंड तसेच कलम 323 भा.दं.वि. अन्वये 1 महिना सक्त कारावास व ₹1,000/- दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर दोन्ही गुन्ह्यांच्या सुनावणीदरम्यान मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट कारकून यांनी साक्षीदार व पंच यांना योग्य प्रकारे ब्रीफिंग केले. मुद्देमाल व त्याचे अहवाल विहित वेळेत न्यायालयात सादर करण्यात आले. तसेच समन्स व वॉरंट पथकाने समन्स वॉरंटची योग्य वेळी बजावणी करून साक्षीदारांना न्यायालयात हजर ठेवले. तपासी अधिकारी, कोर्ट अंमलदार व सरकारी अभियोक्ता यांच्यातील योग्य समन्वयामुळे आरोपींविरुद्धचे सबळ पुरावे मा. न्यायालयासमोर प्रभावीपणे सादर करण्यात आले व दोन्ही प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिलाल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि हणमंत ओऊळकर, सपोनि सुरेश वसेकर, पोउपनि राजेश सोनवणे,पोहेकॉ मेटकरी, मपोशि सरगर पोहवा सुनिल पाटील, पोशि कणसे, मपोशि रुपाली पाटील, पोशि महेश मढवी व पोशि चव्हाण यांनी केली आहे.

***